# चाकूर तालुक्यातील लिंग गुणोत्तराचे भौगोलिक विश्लेषण

**प्रा. डॉ. के.बी. शिंदे बी. ए. मोठेराव**

सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर.संशोधक विद्यार्थी, भूशास्त्र संकुल, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

सारांश:

सदरील शोधनिबंधामध्ये चाकूर तालुक्यातील लोकसंख्येच्या लिंग गुणोत्तराचा अभ्यास सन 2011 या जनगणना वर्षामध्ये करण्यात आला आहे या जनगणना वर्षांमध्ये चाकूर तालुक्यातील मंडळ निहाय लोकसंख्येच्या लिंग गुणोत्तर मध्ये कशाप्रकारे बदल झाला आहे याचा अभ्यास सदरील शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे लोकसंख्येच्या लिंग गुणोत्तराचे कोणकोणत्या घटकाचा परिणाम झालेला आहे याचेही विश्लेषण करण्याचा प्रयत्न या मध्ये करण्यात आला आहे चाकूर तालुक्यातील एकूण लोकसंख्या जनगणना वर्ष 2001 नुसार 157135 एवढी होती तर लोकसंख्या घनता 254 व लिंग गुणोत्तर 916 होते. जनगणना वर्ष 2011 नुसार चाकूर तालुक्याची एकूण लोकसंख्या 178089 एवढी असून या लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर 926 एवढे आहे

**बीज संज्ञा :** लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर

## प्रस्तावना

देशाच्या लोकसंख्येच्या विकासामध्ये सामाजिक आर्थिक सांस्कृतिक आणि राजकीय घटक महत्त्वाची भूमिका बजावतात एखाद्या प्रदेशाची परिस्थितीही तेथील लोकसंख्येच्या प्रमाणावर अवलंबून असते ज्यामध्ये लोकसंख्येची घनता लिंग गुणोत्तर साक्षरता जन्मदर आणि मृत्यू दर या सर्व घटकांचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की सर्वच दृष्टीकोनातून लोकसंख्येच्या अभ्यासाला महत्त्वाचे स्थान आहे लोकसंख्या घटकातील वाढती संख्या ही लोकसंख्या समस्या कारणीभूत ठरत असते तेव्हा उद्भवणाऱ्या समस्या लक्षात घेता देशातील लोकसंख्येची लोकसभा अध्यक्ष माहिती घेणे क्रमप्राप्त ठरते. अध्यावत सांख्यिकीच्या माहितीच्या आधारे लोकसंख्येच्या समस्येचा आढावा व भविष्यातील लोकसंख्येचे अचूक नियोजन करणे शक्य होते लोकसंख्येचे लिंगगुणोत्तर हा घटक लोकसंख्या अभ्यासा मध्ये अत्यंत महत्वाचा आहे लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर म्हणजे दर हजारी पुरुषामागे असणारी स्त्रियांची संख्या यास लिंगगुणोत्तर असे म्हणतात. लोकसंख्येच्या लिंग गुणोत्तर यामुळे अहमदपूर तालुक्यांमध्ये लोकसंख्येचे गुणोत्तर कशा प्रकारचा आहे याचा अभ्यास या शोधनिबंध द्वारे करण्यात आला आहे भारतामध्ये लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर विषम प्रमाणामध्ये पाहावयास मिळते त्याचप्रमाणे अमदपुर तालुका सारख्या ग्रामीण भागांमध्ये लोकसंख्येच्या लिंग गुणोत्तरा मध्ये खूप मोठ्या प्रमाणावर विषमता पाहवयास मिळते आणि याचा परिणाम समाज व एकंदर पर्यावरणावर होताना दिसून येतो.

## अभ्यास क्षेत्र:

लातूर जिल्ह्याचे स्थान महाराष्ट्र राज्याच्या आग्नेय दिशेत आहे चाकुर तालुक्याचे स्थान लातूर तालुक्याच्या पूर्वेस आहे लातूर जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार 17⁰52' उतर ते 18⁰50' उत्तर व रेखावृत्ते विस्तार 76⁰ 28' पूर्व ते 79⁰ 12' पूर्व रेखावृत्त दरम्यान आहे या जिल्ह्यामध्ये एकूण 10 तालुके आहेत पैकी चाकुर तालुका या शोधनिबंधात साठी निवडला आहे चाकूर तालुक्याचे अक्षवृत्तीय विस्तार तालुक्याचे 17⁰58' * उत्तर ते 18⁰30' उत्तर व रेखावृत्तीय विस्तार 76⁰40' पूर्व ते 76⁰53' पूर्व आहे . चाकुर तालुक्याच्या पूर्वेस उदगीर दक्षिणेस शिरूअनंतपाळ , पश्चिमेस लातूर, रेनापुर व उत्तरेस अहमदपूर तालुका आहे चाकुर तालुक्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 683 चौरस किलोमीटर असून चाकुर तालुका मध्ये 2011 च्या जनगणनेनुसार 83 ग्रामीण वसाहती आहेत. चाकुर तालुक्याचे लोकसंख्या 2001 नुसार 157 135 तर 2011 च्या जनगणनेनुसार 178089 एवढी आहे. चाकूर तालुक्यामध्ये 05 महसूल मंडळ आहेत चाकूर, वडवळ, नळेगाव, शेळगाव, झरी बु चाकुर तालुका हा बालाघाट डोंगररांगेतील पठारावर स्थिरावलेला आहे चाकुर तालुक्याचे सरासरी समुद्रसपाटीपासून उंची 538 मीटर एवढी आहे . 2011 च्या लोकसंख्या जनगणना नुसार तालुक्याची लोकसंख्या ची घनता 309 एवढी आहे तर साक्षरतेचे प्रमाण 78.33 टक्के आहे.

**उद्दिष्टे**: १. चाकूर तालुक्यातील लोकसंख्येच्या लिंग गुणोत्तरातील बदल अभ्यासणे. २. लोकसंख्या लिंग गुणोत्तरातील वितरण अभ्यासणे.

संशोधनपद्धती :

सदरील शोधनिबंध हा द्वितीय माहिती यावर आधारित आहे माहिती संकलन करण्यासाठी ड्युटी एक स्रोतांचा वापर करण्यात आला आहे ही माहिती लातूर जिल्हा जनगणना पुस्तिका 2001 व 2011 लातूर जिल्हा गॅझेटिअर भारत व महाराष्ट्र सरकारचा जनगणना अहवाल इंटरनेटवरील माहिती तसेच विविध आकडेवारीचे सादरीकरण करण्यासाठी नकाशा शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**सूत्र :**

$$\text{लिंग गुणोत्तर} = \frac{\text{स्त्रियांची संख्या}}{\text{पुरुषांची संख्या}} \times 1000$$

चाकुर तालुका मंडळ निहाय लोकसंख्येची निवडक माहिती 2011

| मंडळ | क्षेत्रफळ (चौकिमी) | लोकसंख्या | लोकसंख्येची घनता | स्त्री-पुरुष प्रमाण | साक्षरता |
|---|---|---|---|---|---|
| चाकुर | 127.39 | 42171 | 331 | 899 | 61.6 |
| नळेगाव | 128.67 | 46194 | 359 | 889 | 40.36 |
| वडवळ (ना ) | 184.77 | 337941 | 183 | 841 | 42.37 |
| झरी (बु) | 106.75 | 34540 | 229 | 951 | 28.80 |
| शेळगाव | 139.17 | 31390 | 225 | 1049 | 43.39 |
| तालुका एकुण | 683 | 178089 | 260 | 926 | 77.84 |

संशोधकाने अधिकृत माहितीच्या आधारे संकलित केली आहे.

सारणी क्र 1 मध्ये चाकूर तालुक्यातील मंडळ निहाय लोकसंख्येची निवडक माहिती जनगणना वर्ष 2011 या वर्षातील दाखवण्यात आली आहे वरील सारणीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की 2011 या दोन वर्षांमध्ये चाकूर तालुक्यातील सर्वाधिक लोकसंख्येची लिंग गुणोत्तर शेळगाव मंडळामध्ये 1049 एवढे आहे तर सर्वात जास्त लोकसंख्येची घनता नळेगाव मंडळांमध्ये 359 एवढी आहे. 2011 च्या जनगणनेनुसार चाकूर तालुक्याची लोकसंख्या ची घनता दर चौरस किलोमीटर ला 260 एवढी आहे. सर्वात जास्त लोकसंख्येची घनता नळेगाव मंडळामध्ये 359 त्यानंतर चाकूर मंडळांमध्ये 331 जरी बुद्रुक मंडळांमध्ये 229 शेळगाव मंडळांमध्ये 225 आणि सर्वात कमी लोकसंख्येची घनता मंडळांमध्ये 183 इतकी आहे.

म्हणून या साक्षरता प्रमाणाचा विचार केला असता सर्वाधिक साक्षरता प्रमाण चाकूर मंडळांमध्ये 61.6 त्यानंतर शेळगाव मंडळात 43.39 नळेगाव मंडळांमध्ये 40.36 वडवळ (ना )मंडळात 42.36 आणि सर्वात कमी साक्षरता प्रमाण झरी बु मंडळात 28.8 एवढे आहे. दर एक हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण किती आहे याला अनुसरून मंडळनिहाय लिंग गुणोत्तर याचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, सर्वात जास्त लिंग गुणोत्तर शेळगाव मंडळात 1049 त्यानंतर झरी मंडळात 951 वडवळ (ना ) मंडळात 841, चाकूर मंडळात 899 तर सर्वात कमी नळेगाव मंडळांमध्ये 889 एवढे लिंग गुणोत्तराचे प्रमाण दिसून येते.

निष्कर्ष :

चाकूर तालुक्यातील मंडळ निहाय लोकसंख्यची निवडक माहिती चा अभ्यास केला असता असे लक्षात येते की चाकूर तालुक्यातील लोकसंख्येतील साक्षरता प्रमाण लिंग गुणोत्तर स्त्री-पुरुषांचे प्रमाण क्षेत्रफळ यामध्ये विषमता आढळून येते. साक्षरतेच्या प्रमाणाचा अभ्यास केला असता असे निष्कर्ष काढता येईल की चाकूर मंडळांमध्ये सर्वात जास्त साक्षरता प्रमाण पाहावयास मिळते तर इतर मंडळांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यंत अल्प प्रमाणात प्रमाणामध्ये दिसून येते यावरून असा निष्कर्ष काढता येईल की ग्रामीण भागामध्ये शिक्षणाच्या सोयी सुविधांमध्ये वाढ करावे लागेल व तेथील साक्षरता प्रमाण लिंग गुणोत्तर यामधील विषमता दूर करता येईल.

संदर्भ ग्रंथ:

1. लातूर जिल्हा गॅझेटिअर भाग 1 व भाग 2
2. जनगणना पुस्तिका 2011
3. लोकसंख्या भूगोल : डॉ. सुरेश फुले
4. वस्ती भूगोल : डॉ. भोळे ए. एस.
5. लातूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2011, 2015, 2017
6. www.Latur.nic.in